पंचायत समिती, येवलाच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता या सोबतच्या परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप

देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये ४४,७४५/- अदयापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र. २१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वर्गणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातुन सत्वर वसुल करावी व पुर्तता दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- निमगाव बदापूर शिव रस्ता दुरुस्त करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | पंसये/वावी/५/०८ दिनांक १६.१.२००८ |
| तांत्रिक मान्यता | १० जानेवारी २००८ रुपये ३५,०००/- |
| मक्तेदार | चेअरमन अगस्ती मजूर सह. संस्था. मर्या. निमगाव मढ ता. येवला |
| कामाचे आदेश | जिपना/बांख्रा/सआरे/४३/२००८ दिनांक २५.१.२००८ |
| कामाची मुदत | २९.३.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | १७.२.२००८ |
| मोजमाप पुस्तिका व पृ.क्र. | ७६५ पृष्ठ क्रमांक १८ ते १९ |
| अंतिम प्र.क्र. व दि. | १९/ दिनांक ३.३.२००८ रुपये ३५,०००/- |

या खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत:

१) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २९.८.२००५ अन्वये नोंदणीकृत नसलेल्या मक्तेदाराकडून ४% कार्यकंत्राटकर रक्कम वसूल करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु संबंधित चेअरमन अगस्ति मजूर सहकारी संस्थेस अंतिम देयक प्रदान करतांना ४% प्रमाणे रुपये १,४००/- वसूल करण्यात आलेली नाही. सदरची रक्कम ही संबंधित मजूर संस्थेकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

पंचायत समिती वाढीव उपकर
४% कार्य कंत्राटकर वसूलपात्र रक्कम रुपये १,४००.००

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- अंदरसुल – करंजी रस्ता दुरुस्ती करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्र. ५५ दिनांक १४.१.२००८ अन्वये रक्कम रुपये ३५,०००/- |
| तांत्रिक मान्यता | उपअभियंता, उपविभाग येवला तांमा/क/१/०८ रु.३५,०००/- |
| मक्तेदार | चेअरमन साईकृपा मजूर सह. संस्था. मर्या. धुळगाव ता. येवला |
| कामाचे आदेश | जिपना/बांख्रा/सआरे/१४१/२००८ दिनांक २६.१.२००८ |
| कामाची मुदत | २९.३.२००८ |

| | |
|---|---|
| काम पूर्ण दिनांक | १०.३.२००८ |
| मोजमाप पुस्तिका व पृ.क्र. | ७८९ पृष्ठ क्रमांक ८ |
| अंतिम प्र.क्र. व दि. | २१/ दिनांक १७.३.२००८ रुपये ३५,०००/- |

या खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत:

१) वरील कामासाठी दर सुची ही सन २००७ – २००८ वापरण्यात आली आहे. त्यात बाब क्रमांक १ रस्त्यालगतची लहान झाडे झुडी तोडणे व रस्त्याच्या बाहेर टाकणे. याबाबींसाठी दरसुचीतील पृष्ठ क्रमांक २८७ बाब क्रमांक ९७ नुसार रुपये ४.५० प्रति से.मी. दर नमुद केला आहे. परंतु तांत्रिक विभागाने अंदाजपत्रकात रुपये ५/- प्रति से.मी. ला नमुद करुन अदांजपत्रक तयार करण्यात आले आहे.

वरील कामाचे २८०० चौ.मी. एवढे काम झालेले असून (५ – ४.५०) = रुपये ०.५० प्रति चौ.मी. (२८०० X ०.५० = रुपये १४००) संबंधित मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसूल करुन पंचायत समिती वाढीव उपकर खाती जमा करुन अनुपालन दाखवावे.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २९.८.२००५ अन्वये नोंदणीकृत नसलेल्या मक्तेदाराकडून ४% कार्यकंत्राटकर रक्कम वसूल करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु संबंधित चेअरमन अगस्ति मजूर सहकारी संस्थेस अंतिम देयक प्रदान करतांना ४% प्रमाणे रुपये १,४००/- संबंधित मजूर सहकारी संस्थेकडून वसूल केलेली नाही, तो वसूल करुन शासन सदरी भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

वाढीव उपकर
जादा प्रदान रक्कम रुपये १,४००.००
४% कार्य कंत्राट कर रक्कम रुपये १,४००.००
एकूण रक्कम रुपये २,८००.००

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

(एखादया व्यक्तीस तिला मिळालेली रक्कम लेख्यामध्ये दाखवीणे आवश्यक होते, परंतु जी अशी दाखविण्यात आली नाही अशी रक्कम.)

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- ग्रामपंचायत स्तरावरील अफरातफर प्रकरणांबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक ४ दिनांक १७.९.२००८ अन्वये पंचायत समिती, येवला कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींमधील अफरातफर प्रकरणांची माहिती मागविण्यात आली होती.

पंचायत समिती येवला यांनी उपरोक्त अर्धसमास पत्रास अनुसरुन सादर केलेल्या विवरणपत्रानुसार उपलब्ध केलेली माहिती व त्यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

ग्रामनिधीतील एकूण ७ अफरातफर प्रकरणांपैकी ३ प्रकरणांमधील रुपये ५२,५४२/- इतकी वसूली प्रलंबित आहे. जवाहर रोजगार योजनेतील सर्व १० प्रकरणांतील समाविष्ठ रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

ग्रामनिधी एकूण ३ प्रलंबित प्रकरणांपैकी मुखेड ग्रामपंचायत मधील रुपये २१,०९६/- ची वसूली सन १९७४ – १९७५ पासून प्रलंबित आहे. सदर प्रकरणांतील सरपंच व ग्रामसेवक मयत असल्याचे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास – २००५/प्र.क्र.२६२/पंरास/दिनांक ३.९.२००५ नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणांत वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणांतील अपहारीत रक्कम वसूल न झाल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ड ) खालील अनियमितता.

(अ,ब,क,व्यतिरिक्त लेख्यामध्ये आढळुन आलेल्या इतर अनियमितता.)

---

### परिच्छेद क्रमांक १७ :- अनुज्ञेय नसतांना गटविमा वर्गणी कपात केल्याबाबत .

पंचायत समिती येवला यांचेकडील आरोग्य विभागाचे वेतन देयके पडताळणी करता आरोग्य अधिकारी डॉ. श्री. पी. एम. बैरागी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अनकई व डॉ. श्री. पी. एम. खैरनार, यांचे वेतन देयकातून रुपये २४०/- दराने गटविमा वर्गणी कपात केलेली आहे.

सदर आरोग्य अधिका-यांची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/आस्था-३ब/११९४/०७ दिनांक १३.९.२००७ अन्वये ११ महिन्याच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक विमा-१९९०/ प्र.२८०/१८ दिनांक १.९.१९९० मधील अनुक्रम क्रमांक ३(क) नुसार अंशकालिक व तदर्थ कर्मचारी यांना गटविमा योजना लागू होणार नाही अशी स्पष्ट तरतुद केलेली

असतांनाही ११ महिन्याच्या करारावर तात्पुरती नेमणूक असलेल्या कर्मचा-यांची गटविमा वर्गणी कपात करण्यात आलेली आहे.

उपरोक्त बाब ही अतिशय अनियमित असून विनाकारण शासनावर दायित्व ओढवणारी आहे. तरी सदर कपात केलेली गटविमा रक्कम संबंधितांना परत करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन, तसेच पुढील वेतन देयकातून कपात बंद करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- सेवा पुस्तकातील नोंदी अपूर्ण असलेबाबत.**

पंचायत समिती येवलाकडील सन २००७ – २००८ मधील लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांच्या सेवा पुस्तकांची पडताळणी केली असता बहुतांशी सेवा पुस्तकांतील वेतनवाढीचे नोंदीवर गट शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

उदाहरणादाखल काही नावे खालीलप्रमाणे

| अ.क्र. | प्राथमिक शिक्षकाचे नाव | प्राथमिक शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री. आर. आर. ठोंबरे | उस्माडी |
| २ | श्री. दादाजी किसन धुळे | कोटमगाव खुर्द |
| ३ | श्री. शाह अलताफ हुसैन मो. हनीफ | न्यहरखडे (उर्दु) |

वरील उदाहरणादाखल असलेल्या व इतर प्राथमिक शिक्षकांचे सेवा पुस्तकातील रजा लेखा व गटशिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरी घेऊन तशी कार्यवाही पूर्ण केल्याचे प्रमाणित करावे व अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- वेतनपटावर मुद्रांकीत पोहच न घेतलेबाबत.**

पंचायत समिती येवला यांचेकडील सन २००७ – २००८ मधील वेतन देयकांची पडताळणी केली असता वेतन देयकांवर संबंधित कर्मचा-यांची मुद्रांकीत पोहच घेतलेली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.डी.ओ-१००५/ प्र.क्र.५/कोषा/प्रशा-५ दिनांक २९.८.२००५ नुसर वेतनपटावर स्वाक्षरी केल्याशिवाय खात्यातून रक्कम काढण्यात येऊ नये, असे निर्देश देण्यात आलेले आहे.

तथापि पंचायत समिती येवला यांनी कोणत्याही कर्मचा-यांच्या सन २००७ – २००८ वर्षात मुद्रांकीत स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत. तरी सर्व कर्मचा-यांची मुद्रांकीत स्वाक्ष-या घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक २० :- ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आलेल्या अनुदान रक्कमेच्या पावत्या प्राप्त न केल्याबाबत.

पंचायत समिती येवला यांनी प्रमाणक क्र. १९ दिनांक १३.३.२००८ अन्वये रुपये १,९६,८३२/- चे अनुदान ग्रामपंचायतींना वाटप केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १) जमीन महसूल अनुदान | रुपये | ७४,८३२/- |
| २) जमीन महसूल अनुदान | रुपये | ८९,०००/- |
| ३) जमीन समानीकरण अनुदान | रुपये | ३३,०००/- |
| **एकूण** | **रुपये** | **१,९६,८३२/-** |

उपरोक्त अनुदान वाटप करतांना त्यांचेकडून हातपंप, विजपंप वसूली रु.२१,७६६/- व टी.सी.एल. वसूली रु.१,४१,८४५/- अशी एकूण रु. १,६३,६११/- वसूली करुन उर्वरित रक्कम वाटप करण्यात आली आहे.

तथापि ग्रामपंचायतींना वाटप केलेले अनुदान ग्रामपंचायतीच्या लेख्यात जमा करुन त्यांचेकडून नमुना नंबर ७ च्या पावत्या प्राप्त करणे आवश्यक असतांना सावरगाव व खामगांव वगळता कोणत्याही ग्रामपंचायतींनी नमुना नंबर ७ च्या पावत्या दिलेल्या नाहीत. सर्व ग्रामपंचायतींकडून नमुना नंबर ७ च्या पावत्या प्राप्त करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक २१ :- बांधकाम उपविभाग येवला यांचेकडील नोंदवह्यांबाबत

पंचायत समिती येवला अंतर्गत बांधकाम उपविभाग (इ व द) यांचेकडील नोंदवह्या नमुना नंबर ३९,४० व ४१ ची पडताळणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहे.

१) नमुना नंबर ३९ च्या नोंदवहीतील रकाना क्रमांक ७,८ व ९ मध्ये वाढ – घटबाबत आवश्यक तो तपशिल नमुद केलेला नाही.

२) नमुना नंबर ४० रस्ता नोंदवहीतील पृष्ठ क्रमांक ४६ वर सन १९९० मध्ये पूर्ण झालेल्या रस्त्यांची नोंद आहे. त्यापुढील सन १९९० ते २००८ साठी कोणतीही नोंद घेतलेली नाही.

३) नमुना नंबर ४१ नोंदवहीत सन १९६२ पर्यंत ताबा घेतलेल्या जमिनींची नोंद घेतलेली आहे. त्यापुढील कोणतीही नोंद घेतलेली नाही.

सदर नोंदवही अद्ययावत व प्रमाणित करुन नोंदविलेल्या सर्व जमीनींचे ७/१२ उतारे घेऊन सदर जमीन जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याची खात्री करुन,

त्या जागेत अतिक्रमण झालेले नसल्याबाबत उपअभियंता, बांधकाम विभाग यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

याबाबत मागील वर्षी सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालात क्रमांक २० नुसार आक्षेप नोंदवूनही काहीही कार्यवाही झालेली नाही. ही बाब खेदजनक आहे. तरी त्वरीत पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- लघुपाटबंधारे उपविभाग, येवला यांचेकडील नमुना नंबर ३९ व ४१ नोंदवह्यांबाबत.**

पंचायत समिती, येवला अंतर्गत लघुपाटबंधारे उपविभाग यांचेकडील नोंदवह्या नमुना नंबर ३९ व ४१ ची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) मालमत्ता नोंदवही नमुना नंबर ३९ मधील स्तंभ क्रमांक ८ व ९ मध्ये वाढ – घटबाबत योग्य तो तपशिल नमुद केलेला नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चा नियम ९० – ९७ नुसार वार्षिक पडताळणी प्रमाणपत्र सक्षम प्राधिका-यांना सादर करणे आवश्यक असतांना सन १९९९ पासून प्रमाणपत्र सादर केल्याची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

३) नमुना नंबर ४१ ची नोंदवही परिरक्षीत केलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १९ दिनांक ७.१०.२००८ अन्वये माहिती उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले असता सदर नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याचे लेखी कळविले आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.

उपरोक्त प्रमाणे पुर्तता करुन तसेच नमुना नंबर ४१ नोंदवही परिरक्षीत करुन त्यात परिपूर्ण नोंदी घेऊन तसेच गावतळे व पाझरतलावांच्या प्राप्त / संपादित जमीन जिल्हा परिषदेच्या मालकीच्या झाल्या असल्याबाबत जमिनीचे ७/१२ उतारे उपलब्ध करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी. याबाबत मागील सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालात क्रमांक २० अन्वये आक्षेप नोंदवूनही त्याची दखल घेण्यात आलेली नाही, ही बाब खेदजनक आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- शिल्लकी रक्कमेची सुरक्षितता व पडताळणीबाबत.**

पंचायत समिती येवला यांचेकडील रोखपालाची रोखवही नमुना नंबर ४ चे लेखापरीक्षण करता गटविकास अधिकारी, येवला यांनी अचानक पडताळणी करुन रोखवहीतील शिल्लक रक्कम व प्रत्यक्ष रोखपेटीतील शिल्ल्क बरोबर असल्याची खात्री करुन त्या अर्थाचे प्रमाणपत्र रोखवहीत नमुद केलेले नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४२ नुसार कार्यालय प्रमुखाने किमान दर तीन महिन्यातून एकदा कार्यालयातील रोखपालाची रोखवही व रोखपेटीतील शिल्लक रक्कमेची अचानक पडताळणी करुन बरोबर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच पडताळणीअंती आढळून आलेली रक्कम रोखवहीशी जुळते किंवा कसे याबाबत प्रमाणपत्र रोखवहीत दिनांकीत स्वाक्षरीसह नमुद करणे आवश्यक आहे.

तथापि गटविकास अधिकारी, येवला यांनी अशाप्रकारे अचानक पडताळणी केलेली नाही. रोखपालाच्या ताब्यात पंचायत समितीची मोठ्या रोख रक्कमेची जबाबदारी सोपविण्यात आलेली असल्याने त्यांचेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यालय प्रमुखाने अशाप्रकारे अचानक पडताळणी करणे आवश्यक आहे.

तरी या अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन नियमानुसार नियमित कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक २४ :- ग्रामसेवक व शिक्षक यांचेसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानाबाबत.

पंचायत समिती येवला अंतर्गत बांधकाम विभागाकडील नोंदवही नमुना क्रमांक ३९ ची पडताळणी केली असता सदर नोंदवहीत ग्रामसेवक व शिक्षक यांचेसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अर्धसमास पत्र क्रमांक १८ दिनांक २०.९.२००८ अन्वये प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

पंचायत समितीने ग्रामसेवकांसाठी ४५७.५० चौ.फुटांची एकूण ७ निवासस्थाने व शिक्षकांसाठी ३६०.०० चौ.फुटांची ३ निवासस्थाने बांधलेली आहेत. त्यापैकी फक्त १ ग्रामसेवक निवासस्थान वापरात असून उर्वरित ९ निवासस्थाने नादुरुस्त सदरी विनावार पडून आहेत.

नियोजन व दुरुस्ती देखभालीअभावी ही निवासस्थाने विनावापर असून त्यांचे दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही बांधकाम विभागाकडून करण्यात आलेली नाही. असे असतांनाही दरवर्षी लेखासंहिता नियम ९० – ९७ नुसार चुकीचे पडताळणी प्रमाणपत्र वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येत आहेत. यामुळे मुळ बांधकामावरील खर्च व्यर्थ ठरण्याबरोबर मालमत्तेची नाहक हानी होत आहे. तसेच घरभाडे / अनुज्ञप्ती शुल्कापोटी येणे महसुलाचीही हानी होत असून, संबंधित कर्मचारी त्याचे मुख्यालयी अधिकृत निवासस्थानात उपलब्ध नसल्याने जनतेस असुविधा होत असल्याचा संभव आहे.

तरी याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन व सदर निवासस्थाने दुरुस्तीबाबत ठोस कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- तालुका मास्तर यांनी रुपये १,०००/- चे वरील धनादेश रेखांकीत न करता प्रदान केल्याबाबत.**

तालुका मास्तर, येवला यांचेकडील सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षातील प्रदान धनादेश स्थळप्रतींची पडताळणी केली असता ते रेखांकीत न करता प्रदान करण्यात आले आहेत. रेखांकीत धनादेशाद्वारे रक्कम प्रदान करण्याची कार्यवाही दिनांक १२.३.२००८ पासून करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २५ नुसार रुपये १,०००/- चे पुढील सर्व रक्कमेची प्रदाने रेखांकीत धनादेशाद्वारे करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही तालुका मास्तर येवला यांनी केलेली नाही.

तरी सन २००७ – २००८ मध्ये रेखांकीत न करता धनादेशाद्वारे प्रदान रक्कमा संबंधितांनी त्यांच्या रोखवहीत जमा केल्याची खात्री करुन तसे प्रमाणित करावे. तसेच सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- निवृत्ती वेतन प्रदान आदेश व नोंदवहीतील अनियमिततेबाबत.**

पंचायत समिती येवला अंतर्गत शिक्षण विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील निवृत्ती वेतन प्रदान प्रकरणीं पडताळणी करता त्यांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यांत येत आहेत:

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ नियम ६९ नुसार नमुना क्रमांक एपीपी ९ मधील नोंदवहीत निवृत्ती वेतन प्रदानांची नोंद ठेवणे आवश्यक आहे. पंचायत समिती येवला अंतर्गत सामान्य प्रशासन व शिक्षण विभागाने विहीत नमुन्यात नोंदवही परिरक्षीत केली असून त्यामध्ये प्रदानाच्या नोंदी घेतलेल्या आहेत. सदर नोंदवहीतील डावीकडील पृष्ठांवर निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन यांचा दर व इतर आवश्यक माहिती तसेच सुधारीत आदेशानुसर बदल करण्यात आलेला दर व त्याचा प्रदान कालावधी, कमी करावयाचा दर व कालावधी इत्यादी तपशील नोंदविला आहे. परंतु सदर नोंदी सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत. मुळ आदेशावरुन नोंदवहीत घेतलेल्या नोंदी बरोबर असल्याची खात्री करुन सक्षम प्राधिका-याने पूर्ण स्वाक्षरीसह प्रमाणित करणे आवश्यक आहे. प्रमाणित न केलेल्या नोंदीनुसर केल जात असलेले प्रदान योग्य आहे किंवा कसे ? याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही. तरी पूर्ण कार्यवाहीअंती अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

२) निवृत्ती वेतन प्रदान आदेश पुस्तक नमुना एपीपी – ८ ब मध्ये प्रथम मंजूर दर व प्रदान रक्कमेचा तपशिल नोंदविण्यात आलेला आहे. परंतु वेतन आयोगानुसार सुधारीत करण्यात आलेला दर तसेच सुधारीत आदेशान्वये निवृत्ती वेतन दरात झालेला बदल इत्यादी आवश्यक तो तपशील वेळोवेळी नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे

निवृत्तीवेतन प्रदान आदेशावरुन दरमहा होणारे प्रत्यक्ष प्रदान योग्य असल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही. तरी निवृत्ती वेतन प्रदान आदेशात परिपूर्ण नोंदी घेऊन पुर्तता लेखापरीक्षणात दर्शवावी.

३) लेखासंहीता परिशिष्ट ४ – ७७ नुसार दरवर्षी निवृत्तीवेतन अथवा कुटूंब निवृत्तीवेतनधारकाकडून हयातीचे दाखले प्राप्त करणे आवश्यक असून ज्यांचे हयातीचे दाखले प्राप्त होणार नाही त्यांचे प्रदान थांबवणे आवश्यक आहे. पंचायत समिती येवला यांनी दरवर्षी अशाप्रकारचे हयातीचे दाखले बँकेमार्फत प्राप्त करुन नस्तीबध्द केले आहेत. परंतु हयातीचा दाखला प्राप्त झाल्याबाबत नोंदवही नमुना नंबर ए.पी.पी. ९ मध्ये नोंद घेतलेली नाही, किंवा ज्यांचे दाखले प्राप्त झालेले नाही त्यांचे निवृत्तीवेतन प्रदान थांबविण्यांत आलेले नाही. त्यामुळे नियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत उद्देश सफल झालेला नाही. तरी उपरोक्तप्रमाणे नोंद ए.पी.पी. ९ नोंदवहीतील प्रत्येक निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांच्या प्रदान नोंदी समोर घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

४) लेखासहीता परिशिष्ट ४ नियम ८० नुसार ज्यांचे निवृत्ती वेतन त्यांच्या विवाहानंतर किंवा पुनर्विवाहानंतर बंद होण्यास पात्र असतील अशा स्त्री निवृत्ती वेतन धारकांच्या बाबतीत नमुना ए.पी.पी. १४ मधील प्रमाणपत्र दर जून व डिसेंबर ह्या महिन्यात घेणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही पंचायत समिती येवला यांनी केलेली नाही. त्यामुळे केलेले प्रदान असल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही. तरी सहामाही दाखले प्राप्त करुन तशी नोंद ए.पी.पी.९ नोंदवहीत घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

लेखासंहिता परिशिष्ट ४ – ९१ नुसार निवृत्ती वेतनाच्या चुकीच्या प्रदानास संवितरण अधिकारी व्यक्तिशः जबाबदार असल्याने उपरोक्त नमुद बाबींची पुर्तता करुन होणारे प्रदान बरोबर असल्याची खात्री करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २७ :- आहरित धनादेश संबंधितांना प्रदान न केलेबाबत.</u>**

पंचायत समिती, येवला कडील सन २००७ – २००८ मधील लेखापरीक्षण केले असता जिल्हा निधी व अभिकरण योजनेच्या रोखवह्या व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता खालील धनादेश अद्यापपर्यंत संबंधितांना प्रदान करणेत आलेले नाहीत, असे आढळून आले.

| नाव | धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| **जिल्हानिधी** | | | |
| श्री. पांडुरंग आर. फाफले | २६०८६६ | ३१.३.२००८ | १,५०० |
| **अभिकरण योजना** | | | |
| श्री. चंदु महादु लोखंडे, खैरगव्हाण | २६०४३७ | ३१.३.२००८ | ११,८४१ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवाय खर्च करण्यात अनुमती नाही. असे असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्या त्या लेखाशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून खर्च नोंदविलेला आहे, याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्रीबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक ६४ दिनांक ९.८.२००८ नुसार विनावापर पडून असलेल्या यंत्रसामुग्रीबाबतची माहिती उपविभाग (इ व द) येवला यांनी सादर केल्यानुसार त्यांचेकडे रोडरोलर क्रमांक डी.आर.आर. ८२१००४३३ दिनांक १२.२.१९९४ पासून व रोडरोलर क्रमांक डी.आर.आर. ११२७ दिनांक १.४.१९९६ पासून नादुरुस्त असून त्यांची दुरुस्ती किफायतशीर नसल्याचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवा योजना विभाग, शासन निर्णय क्रमांक आयटीआय/३०९४/४०७४/व्यशि-१ दिनांक ४.२.१९९५ नुसार कार्यालयात ज्या नियमित वापराच्या दृष्टीने अयोग्य अशा यंत्रसामुग्री / वस्तु निर्लेखित केल्या जातात. त्या लिलावाद्धारे विकून टाकण्याऐवजी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षक तंत्रनिकेतन, तत्र माध्यमिक शाळा, अभियांत्रिकी महाविद्यालये यांना त्यांचे कडील विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी सदर शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कोणतेही मुल्य न आकारता हस्तांतरीत कराव्यात असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपअभियंता (ल.पा.) उपविभाग यांचेकडील उपरोक्त विनावापर पडून असलेले रोड रोलर हे दुरुस्ती योग्य नसल्याने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार अभियांत्रिकी संस्थांना शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीनुसार हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा केलेबाबत.**

पंचायत समिती येवला येथील सन २००७ – २००८ वर्षात सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ २ ” नुसार विषयांकीत दैनंदिन्या प्राप्त झालेल्या नसल्याचे नोंदवहीवरुन स्पष्ट होते.

ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या दैनंदिन्या सादर नसतांना वेतन व भत्ते अदा करणेबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अदा केलेल्या संपूर्ण कालावधीत हे सर्व कर्मचारी व अधिकारी विहित कर्तव्यासाठी कार्यरत असल्याचे व त्यांनी विहीत इष्टांकपूर्ती केल्याचे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

## परिच्छेद क्रमांक ३० :- सेवा पुस्तकातील मुळ वेतन नोंदीबाबत.

पंचायत समिती, येवलाकडील सन २००७ – २००८ मधील लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता माहे फेब्रुवारी पेड इन मार्च २००८ या वेतन देयकांची तपासणी केली असता कमी / जादा वेतन देय झालेले असून तपशील खालीलप्रमाणे आहेत.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | प्राथमिक शिक्षकाचे नाव | वेतन देयक फेब्रुवारी पेड इन मार्च २००८ मधील मुळ वेतन नोंद | सेवा पुस्तकांमध्ये मुळ वेतन नोंद | प्राथमिक शिक्षकांस कमी / जादा देय वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. वि. वा . पिंगळे | ६,००० | ६,०५० | (-)५० |
| २ | श्री. त्र्यंबक काळू चौधरी | ५,५०० | ५,६२५ | (-) १२५ |
| ३ | श्रीमती. माधुरी सुधाकर नागपुरे | ६,००० | ६,१२५ | (-) १२५ |
| ४ | श्री. रामकृष्ण सुर्यभान घुगे | ४,५०० | ४,६२५ | (-) १२५ |
| ५ | श्री. विश्वास नथु जोंधळे | ५,७५० | ५,८७५ | (-) १२५ |
| ६ | श्रीमती. नसरीन अजुंम आ. रहमान | ४,६२५ | ४,७५० | (-) १२५ |
| ७ | श्रीमती. शबाना रज्जाक | ४,५०० | ४,६२५ | (-) १२५ |
| ८ | श्री. सुबोध रतनसिंग पाटील | ४,५०० | ४,६२५ | (-) १२५ |
| ९ | श्रीमती. वर्षा उत्तम ठोके | ४,५०० | ४,८७५ | (-) ३७५ |
| १० | श्रीमती. रजियाबानो हबीब खान | ९,३०० | ९,१०० | (+) २०० |
| ११ | श्री. रत्नाकर बाळाजी अहिरे | ७,७७५ | ७,९५० | (-) १७५ |

तसेच श्री. अशोक बाबुराव जाधव यांचे सेवा पुस्तक तपासले असता दिनांक १.१.२००५ पासून मुळ वेतन रुपये ७,७००/- असून फेब्रुवारी पेड इन मार्च २००८ वेतन बिलावर रक्कम रुपये ७,९००/- दिलेले आहे. सदर सेवा पुस्तकांत दि. १.१.२००६, दि. १.१.२००७ व दि. १.१.२००८ या वेतनवाढ दिनांकास मुळ वेतन नोंद नसून गट शिक्षण अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली आढळून आली नाही.

उपरोक्त तफावतींबाबत पडताळणी करुन सेवा पुस्तकांत अद्ययावत नोंदी घेऊन प्रदान बरोबर असल्याचे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

## परिच्छेद क्रमांक ३१ :- जामीन कदबे आणि नोंदवहीबाबत.

पंचायत समिती येवलाचे सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात गटविकास अधिकारी यांचेकडील कर्मचारी आस्थापनेचे जामीन कदबे नोंदवही नमुना

नंबर ६ यांचे तपासणीअंती या अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक “ ३ ” मध्ये नमुद केल्यानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम ४३(४) नुसार हमीपत्र नोंवही नमुना नंबर ६ मध्ये हमीपत्र तयार केल्यची तारीख, प्रत्येक वर्षी जामीनदाराचे हयातीचे आणि पात्रतेचे निष्कर्ष नोंदविण्यात येतील. तसे जामीनदारांचे राहण्याचे पत्ते नमुद करण्यात येतील. नियमाप्रमाणे कार्यालयाने सन २००७ – २००८ करीता नोंदवहीमध्ये अशा प्रकारच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. तरी तरतुदीप्रमाणे उचित कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

---

## परिच्छेद क्रमांक ३२ :- जंगम मालमत्ता नोंदवहीतील विनावापर पडून असलेल्या साहित्याबाबत.

पंचायत समिती येवला यांचेकडील जंगम मालमत्ता नोंदवहीची पडताळणी केली असता या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक “४” मध्ये नमुद केल्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात वापरास योग्य नसलेले साहित्य पडून आहे. सदर साहित्यात मोठ्या प्रमाणात लाकडी साहित्य (टेबल, खुर्ची) यांचा समावेश आहे.

सदर विनावापर पडून असलेल्या साहित्यांपैकी दुरुस्ती योग्य साहित्याची दुरुस्ती करुन ते वापरात आणून दुरुस्ती योग्य नसलेले साहित्य त्वरीत निर्लेखीत करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, उच्च तंत्रशिक्षण आणि सेवा योजना विभाग, शासन निर्णय क्रमांक आय.टी.आय./३०९४/४०७४/व्यशि–१/दि. ४.२.१९९५ नुसार कार्यालयात ज्या नियमित वापराच्या दृष्टीने अयोग्य अशा यंत्रसामुग्री / वस्तु निर्लेखित केल्या जातात त्या लिलावाद्वारे विकून टाकण्याऐवजी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण, तंत्रनिकेतन, तंत्र माध्यमिक शाळा, अभियांत्रिकी महाविद्यालये यांना त्यांचेकडील विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी सदर शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करुन कोणतेही मुल्य न आकारता हस्तांतरीत कराव्यात, असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

पंचायत समिती, येवला यांचेकडील उपरोक्त विनावापर पडून असलेले साहित्य उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार अभियांत्रिकी संस्थांना शासन निर्णयात नमुद कार्यपध्दतीनुसार हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करावी. उर्वरित साहित्याचे ही निर्लेखन करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक ३३ :- वार्षिक लेखे.

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील संपूर्ण पुर्ततेच्या अधिन राहुन आणि लेखापरिक्षीत निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांमध्ये अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता स्पष्ट झालेली नाही यास अधीन राहून,

या पंचायत समितीचे सन २००७ – २००८ चे वार्षिक लेखे बरोबर असल्याचे प्रमाणीत करणेत येते.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३४ :- लेख्यांची स्थिती.</u>**

पंचायत समितीची लेखा स्थिती सर्वसाधारण चांगली आहे. लेख्यांच्या स्थितीमध्ये अधिक सुधारणा करणेत यावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३५ :- आक्षेप विवरणपत्र.</u>**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पूर्तता लेखापरीक्षण कालावधीत करुन घेण्यात आल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमित करणेत आलेले नाही.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३६ :- अनुपालन व पोहोच.</u>**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेपासुन चार महिन्याच्या आत, पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावा. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**<u>प्रत सविनय सादर :-</u>**

१. मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३. मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवीमुंबई
५. मा. उपमुख्य लेखा परीक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**<u>प्रत अग्रेषित :</u>**

६. म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
७. म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, येवला जिल्हा नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक